दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे      सहसंपादक : तुकाराम कामठे

वर्ष ५ । अंक २०० । गुरुवार ३० एप्रिल २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २   https://epaper.dainkaakarshan.com   E-mail- dainikaakarshan@gmail.com   RNI NO. MAHMAR/2021/84322


### सुट्टीची सूचना
महाराष्ट्र दिनानिमित्त 'दैनिक आकर्षण' कार्यालयास शुक्रवार , दि. १ मे २०२६ रोजी सुट्टी असल्याने या दिवशीचा अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचक, जाहिरातदार, एजंट यांनी नोंद घ्यावी.

**सर्वांना महाराष्ट्र दिनाच्या व कामगार दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!**

- संपादक


या गुढी पाडव्याला आपल्या घराला द्या नवीन आणि आधुनिक साज!

इंटेरिअर डिझायनर श्रेया निलाखे
घर, फ्लॅट व ऑफिससाठी आकर्षक आणि आधुनिक इंटेरिअर डिझाईन.



- आधुनिक व मिनिमल डिझाईन
- स्मार्ट स्पेस प्लॅनिंग
- बजेटमध्ये सुंदर इंटेरिअर सोल्युशन्स

संपर्क: 75-59-26-16-75


# जिल्ह्यातील दहा अधिकारी-कर्मचाऱ्यांना पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह जाहीर

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जिल्ह्यातील ४ पोलीस अधिकारी व ६ अंमलदार अशा दहा अधिकारी- कर्मचाऱ्यांना सन २०२५ या वर्षासाठी पोलीस महासंचालकांचे सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र जाहीर झाले आहे. उद्या, महाराष्ट्र दिनी हा पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे. उत्कृष्ट कामगिरीबद्दल हा गौरव करण्यात आला असून याबद्दल पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी सर्वांचे अभिनंदन केले.

पुरस्कार प्राप्त प्रमुख सन्मानित अधिकाऱ्यांमध्ये अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्मे, पोलीस निरीक्षक प्रवीण पुंडलिक साळुंखे, पोलीस निरीक्षक मुक्तारखान गुलजारखान पठाण, पोलीस निरीक्षक प्रल्हाद भानुदास गीते यांचा समावेश आहे तर अंमलदारांमध्ये सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पदावर कार्यरत असलेले अंमलदार गोविंद दादाबा गोल्हार, मनोहर नामदेव शेजवळ:, अजय नारायण नगरे, संजय जबाजी खंडागळे, नितीन पोपट गांगुर्डे व राजेंद्र आप्पासाहेब सुद्रिक: (पोलीस हेडकॉन्स्टेबल) यांना हा पुरस्कार जाहीर झाला आहे.

उद्या, महाराष्ट्र दिनी पोलीस मुख्यालय मैदानावर होणाऱ्या कार्यक्रमात जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते व विविध मान्यवरांच्या उपस्थितीत या पुरस्कारांचे वितरण होणार आहे.

# खुनाच्या प्रयत्नाच्या गुन्ह्यातील फरार दोघे पुण्यातून जेरबंद



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** खुनाच्या प्रयत्नाच्या गुन्ह्यातील फरार दोघांना जेरबंद करण्यात स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेला यश आले आहे. आदित्य अंकुश शिरसाठ (वय-२२ वर्षे) व मंगेश अंकुश शिरसाठ (वय-२० वर्षे दोघे रा. शिरसाठवाडी, ता. पाथर्डी जि. अहिल्यानगर) अशी अटक आरोपींची नावे आहेत.

प्रस्तुत बातमीची हकीगत अशी की, दिनांक २७ मार्च रोजी सकाळी आरोपी अंकुश रामा शिरसाठ यास थोडा बाजूला व्हा पलीकडे जाऊ द्या असे फिर्यादी म्हणाल्याचा राग येऊन आरोपी मंगेश शिरसाठ, आदित्य शिरसाठ, बाळासाहेब रामा शिरसाठ, लक्ष्मण शिरसाठ, संदीप शिरसाठ अशांना बोलावून गैरकायद्याची मंडळी जमवुन फिर्यादीस लोखंडी गज, लाकडी दांडके व धारदार शास्त्राने तसेच लाथा बुक्क्यांनी बेदम मारहाण केली. याप्रकरणी पाथर्डी पोलीस ठाण्यात जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल आहे.

पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे उपनिरीक्षक महादेव गुट्टे, पोलीस अंमलदार फुरकान शेख, राहुल डोके, आकाश काळे, बाळासाहेब गुंजाळ, सुनील मालणकर, प्रशांत राठोड, चालक अरुण मोरे, यांच्या पथकास गुन्ह्यातील आरोपींना ताब्यात घेण्याच्या सूचना दिल्या होत्या.

त्यानुसार पथक गुन्ह्यातील पाहिजे आरोपींचा शोध घेत असतांना पथकास सदर गुन्ह्यातील आरोपी सिंहगड पुणे परिसरात असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पथकाने जाधवनगर, वडगाव पुणे येथे जाऊन आदित्य शिरसाठ व मंगेश शिरसाठ यांना ताब्यात घेतले. आरोपींना पाथर्डी पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले आहे.

कस्टोडियल टॉर्चरप्रकरणी कठोर कारवाईची मागणी

# सराफ सुवर्णकार संरक्षण समितीचे ठिय्या आंदोलन व उपोषण सुरू

**दोषी पोलीस अधिकाऱ्यांवर तात्काळ गुन्हे दाखल करून सेवेतून बडतर्फ करा संघटनेचा इशारा**




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** कोतवाली पोलीस ठाण्यात घडलेल्या कथित कस्टोडियल टॉर्चर, बेकायदेशीर ताबा, अमानुष मारहाण व खंडणी प्रकरणी दोषी पोलीस अधिकाऱ्यांवर तात्काळ फौजदारी कारवाई करावी, या मागणीसाठी सराफ सुवर्णकार संरक्षण समिती महाराष्ट्र राज्याच्या वतीने पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन व उपोषण सुरू करण्यात आले आहे.

या आंदोलनात संघटनेचे संस्थापक अध्यक्ष काकासाहेब बोऱ्हाडे, अध्यक्ष उमेश बुऱ्हाडे, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष गणेश टाक, संपर्कप्रमुख अतुल पंडित यांच्यासह उमेश बागडे, ओंकार गडगिळे, अक्षयनाथ शहाणे, अमोल रायमोकर, लक्ष्मण दहिवाळ, गजानन शहाणे, गणेश मैड, दिलीप सिदवाडकर, प्रथमेश नगरकर, श्रीनिवास इंदपूर आदींसह राज्यभरातील सुवर्णकार व्यावसायिक मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत.

संघटनेने दिलेल्या निवेदनानुसार, १६ एप्रिल २०२६ रोजी कोतवाली पोलीस ठाणे, अहिल्यानगर येथे अत्यंत गंभीर घटना घडली. बोधेगाव (ता. शेवगाव) येथील सराफ व्यावसायिक भागवत अदापुरे यांना कोणतीही कायदेशीर प्रक्रिया न पाळता दुकानातून जबरदस्तीने ताब्यात घेण्यात आले.

त्यानंतर त्यांना वाहनात तसेच पोलीस ठाण्यात अमानुष मारहाण करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेला विरोध करण्यासाठी आलेल्या नातेवाईक व समिती सदस्यांनाही पोलीस ठाण्यातच मारहाण करून बेकायदेशीर ताब्यात ठेवण्यात आल्याचे निवेदनात नमूद आहे. संघटनेच्या मते, संबंधित पोलीस अधिकाऱ्यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे तसेच शासनाच्या जीआरमधील मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन केले. ■ पान ४ वर

# तरुणाच्या खून प्रकरणी दोघे अटकेत

**भिंगार कॅम्प पोलिसांनी उलगडले बेपत्ता तरुणाच्या खुनाचे रहस्य**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** तरुणाची निर्घृण हत्या करून पुरावा नष्ट करण्यासाठी त्याचा मृतदेह उसाच्या शेतात फेकून दिल्याचा धक्कादायक प्रकार भिंगार कॅम्प पोलिसांनी उघडकीस आणला आहे. शुभम हरी भोसले व समाधान उर्फ बाळ्या रामदास सोनवणे अशी अटक आरोपींची नावे असून, प्रसाद रोहिदास जाधव असे मृत तरुणाचे नाव आहे.

दि.२७ एप्रिल २०२६ रोजी नगर तालुक्यातील वाकोडी गावच्या शिवारात दत्तात्रय गवळी यांच्या उसाच्या शेतात एक बेवारस बॅग सापडली. या बॅगेत प्रसाद रोहिदास जाधव याचे आधारकार्ड आणि रक्ताचे डाग मिळून आले. पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवली असता, प्रसाद हा परीक्षेसाठी जातो असे सांगून घरातून बाहेर पडला आणि तेव्हापासून बेपत्ता झाल्याची माहिती मिळाली.

भिंगार कॅम्प पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता फुटेजमध्ये प्रसाद जाधव याला काही संशयित इसम मोटारसायकलवर बसवून नेताना दिसले. या माहितीच्या आधारे पोलिसांनी २९ एप्रिल रोजी पहाटे ४ वाजता वाकोडी परिसरात कोम्बिंग ऑपरेशन राबवत शुभम हरी भोसले आणि समाधान उर्फ बाळ्या रामदास सोनवणे या दोघांना ताब्यात घेतले. आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली असून, २६ एप्रिल रोजी रात्री साडेआठच्या सुमारास त्यांनी प्रसाद जाधव याला लाकडी दांडक्याने आणि दगडाने ■ पान ४ वर

# पाथर्डीतील दोन पोलीस लाचलुचपतच्या जाळ्यात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अपघातग्रस्त मोटरसायकल जमा केल्यानंतर पुढील कायदेशीर कार्यवाहीकरिता मदत करण्यासाठी पाच हजार रुपयांची लाच घेताना पाथर्डी पोलीस ठाण्यातील दोन पोलिसांना लाच लुचपत प्रतिबंधक पथकाने रंगेहाथ जेरबंद केले आहे. पोहेकॉ अभयसिंह काकासाहेब लबडे (वय ४० वर्षे, व्यवसाय नोकरी, पोलीस विभाग, वर्ग-३, नेमणूक पाथर्डी पोलीस स्टेशन) व पोकॉ ज्ञानेश्वर मारूती सानप (वय ३६ वर्षे, व्यवसाय नोकरी, पोलीस विभाग, वर्ग-३, नेमणूक पाथर्डी पोलीस स्टेशन. या. तारकेश्वरगड, माळी बाबुळगाव, ता. पाथर्डी) अशी या लाचखोर पोलिसांची नावे आहेत.

तक्रारदार यांचा मागील महिन्यात मढी गावाजवळ स्वतः चालवत असलेल्या एफझेड मोटारसायकल व बुलेटचा अपघात झाला होता. त्यासंदर्भात अपघातग्रस्त बुलेट चालक यांना दवाखान्यातून डिचार्ज दिल्यानंतर त्यांनी दि. २४ एप्रिल रोजी तक्रारदार यांच्या विरोधात पाथर्डी पोलीस स्टेशन येथे अपघाताची फिर्याद दिली होती. त्यासंदर्भाने बिट हवालदार अभय लबडे याने तक्रारदार यांना दि. २८ रोजी पोलीस स्टेशन पाथर्डी येथे बोलावून त्यांची मोटरसायकल जमा करून घेतली. गाडी सोडवण्यासाठी, तक्रारदार यांच्लायाऐवजी परवानाधारक वाहनचालक तपासात दाखविण्यासाठी व पुढे कोर्ट कामकाजात मदत करण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे सात हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली.

याबाबत तक्रारदाराने नगरच्या लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली. त्यानुसार काल दिनांक २९ रोजी समक्ष पडताळणी केली असता लबडे याने सात हजार रुपयांची मागणी करून तडजोडीअंती पाच हजार रुपये लाच स्वीकारली व बीट मदतनीस ज्ञानेश्वर सानप याच्याकडे दिली. या दोघांना रंगेहाथ जेरबंद करण्यात आले.

ही सापळा कारवाई सापळा अधिकारी पोलीस उपअधीक्षक सुरेश शिरसाठ (नाशिक), तसेच पथकातील पोकॉ संजय ठाकरे, पोकॉ योगेश शिंदे आदींनी केली.

# पोलिसांच्या दुर्लक्षेमुळे मोबाईल चोरीच्या घटनांमध्ये वाढ

**दैनिक आकर्षण । राजेंद्र बटुळे**

**अहिल्यानगर–** स्वस्तिक चौकातील पुणे बसस्थानकात प्रवाशांची वाढती गर्दी पाहता चोऱ्यांच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे पांडुरंग दिनकर केकान(रा माळेगाव चाकला,ता शिरुर कासार,जि.बीड) यांचा मोबाईल चोरट्यांनी चोरुन नेला आहे ही घटना दि. २९ एप्रिल रोजी घडली आहे. त्यामुळे पोलिसांच्या कार्यक्षमतेवर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सध्या जुन्या बस्थानकाचे काम सुरू आहे त्यामुळे स्वस्तिक चौकातील पुणे बसस्थानकात प्रवाशी बस स्थानकात येत असतात तसेच उन्हाळ्याच्या सुट्टीमुळे प्रवाशांची मोठी गर्दी होत आहे या काळात प्रवाशांच्या सुरक्षेसाठी पोलिस कर्मचाऱ्यांची वस्तीसाठी संख्या वाढविणे



आवश्यक आहे परंतु वरिष्ठ अधिकार्यांनी त्याकडे दुर्लक्ष केल्याने हिच साधुन चोरट्यांनी आपला मोर्चा बसस्थानकात प्रवाशांचे मोबाईल व रोख रक्कम अथवा सोन्याचे दागिने चोरण्याकडे मोर्चा वळविला आहे.बुधवारी पांडुरंग केकाण यांचा मोबाईल अशाच पध्दतीने चोरुन नेला आहे.त्यामुळे पोलिसांनी वाढत्या चोर्या रोखण्यासाठी तातडीने चोरांच्या टोळीचा छडा लावावा अशी मागणी होत आहे

# शिरसाटवाडी तलावभिंत दुरुस्ती काम युद्धपातळीवर



(छाया : सतिष जगताप)

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**खरवंडी कासार/पाथर्डी–** तालुक्यातील शिरसाटवाडी येथील बिबे आंबा तलावाच्या भिंतीच्या दुरुस्तीचे काम सध्या प्रशासनाकडून युद्धपातळीवर सुरू असून या कामाला आमदार मोनिका राजळे यांच्या विशेष पुढाकारामुळे गती मिळाली आहे. मागील वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे गंभीर स्थितीत आलेल्या या तलावाच्या भिंतीची दुरुस्ती आता वेगाने सुरू असल्याने परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.मागील पावसाळ्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे बिबे आंबा तलावाच्या भिंतीला अनेक ठिकाणी तडे जाऊन मोठे भगदाड पडले होते. काही भागात भिंतीची माती वाहून गेल्याने ती कमकुवत झाली होती आणि तलाव फुटण्याच्या मार्गावर असल्याची भीती व्यक्त होत होती. या धोकादायक परिस्थितीमुळे नदीकाठावरील शिरसाटवाडी तसेच पाथर्डी परिसरातील वस्तीलगतच्या घरांना आणि नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला होता. स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते.

या पार्श्वभूमीवर आमदार मोनिका राजळे यांनी परिस्थितीची दखल घेत संबंधित विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केला. प्रत्यक्ष स्थळाची पाहणी करून अधिकाऱ्यांना तात्काळ उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या. त्यांच्या प्रयत्नांमुळे या दुरुस्ती कामास मंजुरी मिळून प्रशासनानेही विलंब न लावता कामाला सुरुवात केली.

सध्या या कामासाठी मोठ्या प्रमाणावर यंत्रसामग्रीचा वापर करण्यात येत आहे. जेसीबीच्या साह्याने भिंतीवरील झाडे, झुडपे व मुळांसह वाढलेली वनस्पती काढून टाकण्यात येत आहे. त्यानंतर भिंतीच्या कमकुवत भागात काळी माती व मुरमाचा भराव टाकून मजबुतीकरण केले जात आहे. डंपरच्या साह्याने माती व मुरमाची वाहतूक केली जात असून रोड रोलरने भिंतीचा भाग दाबून घट्ट करण्यात येत आहे. यामुळे भिंतीची स्थिरता वाढविण्यावर विशेष भर दिला जात आहे.

तसेच भविष्यात अशा प्रकारचा धोका निर्माण होऊ नये यासाठी केवळ दुरुस्तीवरच न थांबता भिंतीची उंची सुमारे एक मीटरने वाढविण्याचे महत्त्वपूर्ण कामही हाती घेण्यात आले आहे. या निर्णयामुळे तलावातील ■ पान ४ वर

# जलयात्रेमुळे मध्यप्रदेश आणि महाराष्ट्राचे नाते अधिक दृढ झाले – मुख्यमंत्री डॉ.यादव

**गोदा ते नर्मदा यात्रा महाराष्ट्रातील चौदा कोटी जनतेची-मंत्री बावनकुळे । गोदा ते नर्मदा यात्रेतून जलसंवर्धानाचे मंधन झाले-ना.विखे पाटील**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**महेश्वर/शिर्डी–**'' पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे चरित्र अद्भुत आणि उज्ज्वल होते म्हणूनच आपल्यासाठी आदर्शवत आहे.महाराष्ट्राच्या महापुरुषांनी देशाला दिशा दिली.त्यांचे सुशासन आणि जीवनकार्य अनेक शतकांपर्यत सर्वाना प्रेरणादायी ठरेल.त्यांच्या आशीवार्दानेच सरकारचे काम सुरू असून, गोदा ते नर्मदा यात्रमुळे मध्यप्रदेश आणि महाराष्ट्राचे नाते अधिक दृढ झाले असल्याचे भावोद्गार मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव यांनी काढले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आणि आणि जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जन्मभूमीतून आणि गोदा मातेचे उगमस्थान असलेल्या श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर मधून निघालेली गोदा ते नर्मदा जलयात्रा पाच दिवसांच्या प्रवासानंतर काल बुधवारी महेश्वर येथे पोहोचली. अतिशय भारलेल्या मंगलमय वातावरणात मंत्रघोषाच्या जागरात नर्मदा घाटावर डॉ. यादव यांच्या उपस्थितीत यात्रेचा समारोप महाराष्ट्रातील १३०नद्यामधून आणलेले जल नर्मदेमध्ये विसर्जित करण्यात आले.गोदामातेची महाआरती करून चौंडी येथील मातीचा कलश मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री डॉ मोहन यादव आणि



अहील्यादेवीचे सोळावे वंशज श्रीमंत युवराज यशवंत होळकर बहाद्दूर यांच्याकडे मंत्री विखे पाटील यांच्यासह जलयात्रेत सहभागी झालेल्या मान्यवरांनी सुपूर्त केला.

अहिल्यादेवींच्या राजवाड्यासमोर असलेल्या प्रशस्त घाटावर जलयात्रेचा समारोप सोहळा रंगला. नर्मदेच्या विशाल पात्रातून वाहणाऱ्या पाण्यावरचे हलके तरंग, आकर्षक प्रकाशयोजना महाराष्ट्रातून आलेल्या यात्रेकरूंचा वारकरी सांप्रदायाचा उत्साह, छत्रपती शिवराय व अहिल्यादेवी यांच्या जयजयकाराच्या घोषणा, नर्मदाष्टकमचा नाद आणि नर्मदेची आरती यामुळे कार्यक्रमाची रंगत उत्तरोत्तर वाढतच गेली. कार्यक्रमाचे अध्यक्ष महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, केंद्रीय राज्यमंत्री सावित्री ठाकूर, महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे, पणनमंत्री जयकुमार रावल, होळकर घराण्याचे युवराज यशवंतराव होळकर, खासदार शंकर लालवाणी (इंदूर) व रामराव वडकुते, महेश्वरचे आमदार राजकुमार मेव, आमदार गोपीचंद पडळकर, माजी मंत्री सदाभाऊ खोत, श्री. उद्धव महाराज मंडलिक, महेश्वर नगरपालिकेचे पदाधिकारी, जलसंपदा खात्याचे वरिष्ठ अधिकारी कार्यक्रमास उपस्थित होते.

आपल्या मार्गदर्शनपर भाषणात मुख्यमंत्री डॉ यादव म्हणाले की,राज्यकर्त्याच्या नात्याने अहिल्यादेवींची भूमिका अद्भुत म्हणावी अशीच आहे. त्या आमच्यासाठी सदैव आदर्श आहेत. आमच्या सरकारला त्यांचाच आशीर्वाद आहे, ''परकीय आक्रमकांचा सामना करण्यास लोक घाबरत होते, त्या काळात अहिल्यामाता लढल्या. त्यांचे राज्य छोटे असेल कदाचित; पण लढण्याचा, लोकहितासाठीच राज्य करण्याचा निर्धार मोठा होता.''

''श्रीकृष्णाने सांगितलेला कर्मवाद पुण्यश्लोक अहिल्याबाई जगल्या. त्यांच्या आयुष्यातील प्रत्येक क्षण आपल्याला आदर्श घ्यायला लावणारा आहे. भारतात पूर्व ते पश्चिम आणि उत्तर ते दक्षिण अशा चारही दिशांना त्यांनी नदीकिनारी घाट बांधले. असंख्य देवस्थानांचा ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### कंत्राटी कामगारांचा थकीत पी.एफ मिळण्याच्या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर आरपीआयआमरण उपोषण



**अहिल्यानगर- श्रीगोंदा नगरपरिषदेतील कंत्राटी कामगारांचा मागील दोन वर्षांपासून थकीत असलेल्या भविष्य निर्वाह निधी (पी.एफ) प्रकरणी संताप उफाळून आला असून, प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) गटाच्यावतीने रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) चे राष्ट्रीय अध्यक्ष दीपक भाऊ निकाळजे यांच्या नेतृत्वाखाली आणि दक्षिण जिल्हाध्यक्ष निलेश गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर म्हणून उपोषण करताना कामगार व रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कामगारांच्या म्हणण्यानुसार, यापूर्वीही अनेक वेळा तोंडी व लेखी पाठपुरावा करण्यात आला होता. दिनांक २९ जुलै २०२५ रोजी संबंधित कार्यालयाने ''प्रत्येक महिन्याला पी.एफ देयकासोबत दिला जाईल'' असे लेखी आश्वासन दिले होते. मात्र, त्या आश्वासनाची अंमलबजावणी अद्याप झालेली नसून, दोन वर्षांपासून पी.एफ थकीतच असल्याचा आरोप करण्यात आला आहे. यामुळे संतप्त झालेल्या कामगारांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) गटाच्या माध्यमातून दक्षिण जिल्हाध्यक्ष निलेश गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर येथे सर्व कामगार काम बंद ठेवून आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे. व लवकरात लवकर कामगारांचा पीएफ तात्काळ मिळावा अशी देखील मागणी करण्यात आली आहे.**

### नर्मदा-गोदावरी नदीजोड प्रकल्प अशक्य; 'रेन गेन बॅटरी'च खरा पर्याय

**अहिल्यानगर- नर्मदा आणि गोदावरी नद्यांना जोडण्याची संकल्पना अनेक वर्षांपासून चर्चेत असली, तरी ती प्रत्यक्षात अशक्य, अव्यवहार्य आणि पर्यावरणदृष्ट्या धोकादायक असल्याचा दावा पीपल्स हेल्पलाईनच्या वतीने करण्यात आला आहे. त्याऐवजी ''रेन गेन बॅटरी'' ही पावसाचे पाणी जमिनीत मुरविणारी वैज्ञानिक पद्धतच महाराष्ट्रासाठी जलक्रांती घडवू शकते, असे मत व्यक्त करण्यात आले. ॲड. कारभारी गवळी यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, नर्मदा नदी पश्चिमेकडे तर गोदावरी नदी पूर्वेकडे वाहते. या दोन नद्यांच्या मध्ये सातपुडा आणि विंध्य पर्वतरांगा असल्यामुळे पाण्याचा नैसर्गिक प्रवाह शक्य नाही. त्यामुळे प्रचंड पंपिंग, कृत्रिम उचल व्यवस्था आणि मोठ्या प्रमाणावर कालवे व बोगदे उभारावे लागतील. या प्रकल्पासाठी अंदाजे ३ ते ५ लाख कोटी खर्च अपेक्षित असून, त्यासोबतच सततचा वीजखर्चही मोठा असेल. त्यामुळे हा प्रकल्प आर्थिकदृष्ट्या परवडणारा नाही. याशिवाय मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि गुजरात या राज्यांमध्ये पाण्याच्या हक्कावरून मोठे वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. ''अतिरिक्त पाणी'' ही संकल्पनाही वास्तवात वादग्रस्त ठरू शकते, असेही त्यांनी नमूद केले. पर्यावरणीय दृष्टिकोनातूनही हा प्रकल्प गंभीर परिणाम घडवू शकतो. मोठ्या प्रमाणावर जंगलतोड, जैवविविधतेचे नुकसान आणि हजारो लोकांचे विस्थापन होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे नर्मदा-गोदावरी नदीजोड प्रकल्प व्यवहारात अशक्य असल्याचे स्पष्ट करण्यात आले.याउलट ''रेन गेन बॅटरी'' ही पावसाचे पाणी जमिनीत मुरवून भूजल पातळी वाढविणारी प्रभावी आणि कमी खर्चिक पद्धत असल्याचे सांगण्यात आले. या तंत्रामुळे झाडांच्या मुळांजवळ वर्षभर ओलावा टिकून राहतो, भूजल पुनर्भरण होते आणि शेतीसाठी आवश्यक पाणी उपलब्ध राहते.**

## माहेश्वरी युवक मंडळाची नूतन कार्यकारिणी जाहीर

### अध्यक्षपदी अमित खटोड तर सचिवपदी पियुष झंवर

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरातील सामाजिक, सांस्कृतिक व युवकविकासाच्या कार्यात अग्रेसर असलेल्या श्री माहेश्वरी युवक मंडळ, अहिल्यानगर यांच्या वर्ष २०२६ ते २०२९ या कालावधीसाठी नूतन कार्यकारिणीची घोषणा उत्साहात करण्यात आली. या निवडीत अध्यक्षपदी अमित खटोड यांची तर सचिवपदी पियुष झंवर यांची निवड झाली असून मंडळाच्या पुढील वाटचालीसाठी तरुण व अनुभवी सदस्यांचा समतोल साधण्यात आल्याचे दिसून येते. या घोषणेमुळे मंडळाच्या कार्यात नवचैतन्य निर्माण झाले आहे.





नवीन कार्यकारिणीत अध्यक्ष अमित खटोड ,उपाध्यक्षपदी पवन बंग , सचिव पियुष झंवर ,खजिनदारपदी सी. ए. मनीष नावंदर तर सहसचिवपदी प्रतीक सारडा यांची निवड करण्यात आली आहे. कार्यकारिणी सदस्य म्हणून शाम भुतडा, विशाल झंवर, सुमित चांडक, गोविंदा जाखोटिया, संकेत मानधणे, सी. ए. अनिकेत बलदवा, गोविंद दरक, सुमित बिहाणी, सिद्धार्थ झंवर, संकेत अट्टल, मधुर बिहानी आणि गोविंदा काकाणी यांचा समावेश करण्यात आला आहे. विविध क्षेत्रातील या सदस्यांमुळे मंडळाच्या उपक्रमांना अधिक व्यापकता मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

यासोबतच मंडळाने विविध उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी स्वतंत्र समित्यांचीही घोषणा केली आहे. खेळ समितीमध्ये आदित्य काकाणी व भूषण काबरा, आरोग्य समितीमध्ये अभिनंदन कलानी व वेदांत बजाज, तर सांस्कृतिक समितीमध्ये सी. ए. प्रणव बिहाणी, यश खटोड व ऋषि बजाज यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या समित्यांमार्फत युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी खेळ, आरोग्य व सांस्कृतिक क्षेत्रात विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

अध्यक्ष अमित खटोड यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, ''माहेश्वरी युवक मंडळ हे केवळ एक संघटन नसून युवकांच्या उन्नतीसाठी कार्य करणारे एक सशक्त व्यासपीठ आहे. आगामी काळात सामाजिक बांधिलकी जपत शिक्षण, रोजगार, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रात नवनवीन उपक्रम राबविण्याचा आमचा मानस आहे. सर्व सदस्यांच्या सहकार्याने मंडळाला अधिक उंचीवर नेण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.''

सचिव पियुष झंवर यांनीही आपल्या भाषणात सांगितले की, ''युवकांच्या समस्या ओळखून त्यावर योग्य उपाययोजना करणे ही आमची प्राथमिकता असेल. खेळ, आरोग्य आणि सांस्कृतिक या तिन्ही क्षेत्रांत संतुलित विकास साधण्यासाठी विविध स्पर्धा, शिबिरे आणि जनजागृती कार्यक्रम राबवले जातील. मंडळाच्या प्रत्येक सदस्याला सहभागी करून घेण्यावर आमचा भर राहील.''

उपाध्यक्ष पवन बंग यांनी आर्थिक शिस्त आणि पारदर्शकतेवर भर देत सांगितले की, ''मंडळाच्या निधीचा योग्य वापर करून अधिकाधिक उपक्रम राबविण्याचा आमचा प्रयत्न असेल. आर्थिक नियोजन मजबूत ठेवत सामाजिक कार्यात सातत्य राखणे हे आमचे उद्दिष्ट आहे. सर्व सदस्यांचा विश्वास कायम राखत कार्य पार पाडले जाईल.''

नवीन कार्यकारिणीच्या निवडीमुळे माहेश्वरी युवक मंडळाच्या कार्यात नवसंजीवनी मिळणार असून, खेळ, आरोग्य व सांस्कृतिक क्षेत्रातील उपक्रमांमुळे युवकांना सकारात्मक दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. शहरातील विविध स्तरांतून या नूतन कार्यकारिणीचे स्वागत करण्यात येत असून, आगामी काळात मंडळाकडून अधिक प्रभावी आणि लोकाभिमुख कार्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## राजस्व स्पीड स्केटिंग स्पर्धा २०२६ उत्साहात

### सोहम शिंदेचे सुवर्णपदकासह दमदार यश

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जिल्ह्यातील आधुनिक २०० मीटर आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सिंथेटिक स्केटिंग रिंकवर प्रथमच आयोजित करण्यात आलेली राजस्व स्पीड स्केटिंग स्पर्धा २०२६ उत्साहात आणि जल्लोषपूर्ण वातावरणात पार पडली. संध्याकाळच्या आकर्षक वातावरणात झालेल्या या स्पर्धेने जिल्ह्यातील स्केटिंग क्षेत्राला नवी दिशा दिली.

या भव्य स्पर्धेचे आयोजन राजस्व स्पोर्ट्स क्लबचे संस्थापक तथा अध्यक्ष चेतन शहाणे यांच्या संकल्पनेतून करण्यात आले होते. स्पर्धेचे उत्कृष्ट नियोजन टीम टॉपर्स स्केटिंग अकॅडमीचे मुख्य मार्गदर्शक व आंतरराष्ट्रीय स्केटिंगपटू प्रशांत पाटोळे यांनी केले. स्पर्धेमध्ये विविध वयोगटांतील खेळाडूंनी शानदार कामगिरी करत प्रेक्षकांची मने जिंकली. मुलांच्या गटात सोहम शिंदे, कार्तिक नान्नावरे, जय भंडारी, विआन मुथा आणि विआन पितळे यांनी दमदार प्रदर्शन केले. यामध्ये सोहम शिंदे याने सुवर्णपदक पटकावत विशेष लक्ष वेधून घेतले. तर मुलींच्या गटात ईश्वरी आव्हाड, श्रीनिधी गायकवाड, सई नागरे, सिद्धी घोडेस्वर आणि राजनंदिनी कांडेकर यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत सुवर्णपदकांची कमाई केली.

वरील सर्व खेळाडू राजस्व स्पोर्ट्स क्लब, सावेडी तसेच टीम टॉपर्स स्केटिंग अकॅडमी, बुरुडगाव रोड व वाडियापार्क येथे नियमित सराव करतात. त्यांच्या सातत्यपूर्ण मेहनतीचे हे यश मानले जात आहे.



या स्पर्धेत अहिल्यानगर जिल्ह्यासह सोलापूर, जालना, शिरूर, श्रीरामपूर तसेच विविध तालुक्यांतील नामांकित शाळा व स्केटिंग अकॅडमींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. स्पर्धा ४, ६, ८, १०, १२ वर्षे व खुला गट तसेच क्वॉड, रिक्रिएशन, इनलाईन आणि बिगिनर अशा विविध प्रकारांमध्ये मुला–मुलींसाठी घेण्यात आल्या, अशी माहिती टीम टॉपर्सचे उपाध्यक्ष प्रविण गायकवाड यांनी दिली. स्पर्धेसाठी एम.आय.सी.चे सी.आर.ओ. कर्नल अशोक कुमार, उद्योजक एस. जी. कायगावकरचे संस्थापक सागर जी. कायगावकर, एस.व्ही. बोऱ्हाडेचे संस्थापक विशालजी बोऱ्हाडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते, तर नाशिकचे उद्योजक योगेश शहाणे यांची विशेष उपस्थिती लाभली.

यावेळी कर्नल अशोक कुमार यांनी मुलांना खेळाकडे वळवण्यासाठी व खेळाची आवड निर्माण करण्यासाठी मार्गदर्शन केले. खेळातील यश–अपयश स्वीकारत सातत्य राखण्याचे महत्त्व त्यांनी पालक व खेळाडूंना पटवून दिले.

स्पर्धेत सहभागी सर्व खेळाडूंना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले, तर विजेत्यांना सुवर्ण, रौप्य व कांस्य पदकांनी सन्मानित करण्यात आले, अशी माहिती राजस्वचे पदाधिकारी राहुल पाटोळे व सोमनाथ पाटील यांनी दिली.

ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रतीक आगळे (जालना), संतोष धूत (सोलापूर), सोहम जाधव (शिरूर), प्रमोद डोंगरे, पियुष कदम, प्रतिक्षा पाटोळे, अविनाश काळे, विशाल साळवे, शाम गायकवाड, दिया काळे, नील पाटोळे, आदित्य शिंदे, संस्कार कुलकर्णी, यशवंत नान्नावरे, समर्थ सात्रे, रुद्र काळे, वसीम शेख, साधना मोहिते, बाळू शहाजीराव यांनी विशेष परिश्रम घेतले.

राजस्व स्पोर्ट्स क्लबच्या या उपक्रमामुळे अहिल्यानगर जिल्ह्यात स्केटिंग खेळाला मोठी चालना मिळणार असून भविष्यात राज्य व राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू घडतील, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. तसेच स्पर्धेस उपस्थित सर्व मान्यवर, खेळाडू, पालक, प्रशिक्षक व स्केटिंगप्रेमी प्रेक्षकांचे उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल राजस्व स्पोर्ट्स क्लबचे संस्थापक चेतन शहाणे व टीम टॉपर्स स्केटिंग अकॅडमीचे अध्यक्ष प्रशांत पाटोळे यांनी आभार मानले.

## संत एकनाथ गॅस एजन्सीचा परवाना रद्द करावा

### छावा संघटनेचे तहसीलदार यांना निवेदन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** आज संत एकनाथ गॅस एजन्सी यांच्या मनमानी व बेकायदेशीर कारभाराविरोधात पुरवठा अधिकाऱ्यांकडे परवाना रद्द करण्याची मागणी करत सविस्तर कायदेशीर निवेदन सादर करण्यात आले. संबंधित निवेदनामध्ये ग्राहकांची फसवणूक, नियमांचे उल्लंघन, तसेच शासकीय मार्गदर्शक तत्त्वांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचे गंभीर आरोप नमूद करण्यात आले आहेत.

निवेदनात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की, संबंधित गॅस एजन्सीकडून आवश्यक सेवा वेळेत पुरवण्यात येत नाहीत, ग्राहकांना अनावश्यक त्रास दिला जातो, तसेच वितरण प्रक्रियेमध्ये पारदर्शकतेचा पूर्णतः अभाव आहे. या सर्व बाबी एलपीजी वितरणासंदर्भातील शासन नियमांचे सरळ उल्लंघन असल्याचे नमूद करून एजन्सीचा परवाना तात्काळ रद्द करण्यात यावा, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. यावेळी तहसीलदार ज्योती पवार मॅडम यांनी तात्काळ समिती नेमून तहसील कर्मचारी राजेश शिंदे, विनोद क्षीरसाठ यांना सदर गॅस एजन्सी वरती पंचनामा करण्यासाठी रवाना करून पंचनामा अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या आहे. त्याअनुषंगाने सदर गॅस एजन्सीवर तहसील कर्मचारी यांच्या वतीने पंचनामा करण्यात आला आहे.

यावेळी निवेदन सादर करणाऱ्या प्रतिनिधींनी सांगितले की, ''संत एकनाथ गॅस एजन्सीचा कारभार पूर्णतः बेजबाबदार असून, ग्राहकांच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन होत आहे. अनेक वेळा तक्रारी करूनही कोणतीही दखल घेतली गेली नाही. त्यामुळे आता आम्हाला कायदेशीर मार्गाचा अवलंब करावा लागत आहे. प्रशासनाने तात्काळ कठोर कारवाई न केल्यास पुढील टप्प्यात उच्च न्यायालयीन लढा उभारण्यात येईल.''

पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी निवेदन स्वीकारून प्रकरणाची चौकशी करण्यात येईल, तसेच नियमांनुसार योग्य ती कारवाई केली जाईल, असे आश्वासन तहसीलदार ज्योती पवार यांनी दिले आहे.

दरम्यान, या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून, ग्राहकांमध्ये समाधान व न्याय मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. प्रशासनाने या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी सर्वसामान्य नागरिकांची मागणी आहे. यावेळी उपस्थित दादासाहेब पठाडे, छावा संघटनेचे अनिल राऊत, किशोर सदावर्ते, साईनाथ कर्डिले, गणेश पवार, रामेश्वर बावणे, विशाल काळे, सुधाकर सुलताने, राजेश शेजवानी, प्रीतम आडसूळ, लक्ष्मण धरम, अंबादास कानडे आदी उपस्थित होते.

## स्व. माधवराव मुळे प्रतिष्ठानकडून वस्तीगृहांमधील विद्यार्थ्यांना चादर,ब्लँकेट वाटप

### १० वस्तीगृहांतील विद्यार्थ्यांना मदतीचा हात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्वर्गीय माधवराव दगडूजी मुळे प्रतिष्ठानच्या वतीने अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या अंतर्गत चालणाऱ्या जिल्ह्यातील १० वस्तीगृहांमधील विद्यार्थ्यांना चादर व ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत विद्यार्थ्यांच्या गरजांची दखल घेत हा उपक्रम राबविण्यात आला.



कायनेटिक चौक येथील यश ग्रॅण्ड हॉटेलमध्ये प्रतिष्ठानची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात पार पडली. यावेळी विविध वस्तीगृहांचे अधीक्षक व मुख्याध्यापक यांना विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असलेले चादर व ब्लँकेटचे साहित्य पाहुण्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमास प्रा. शशीकांत गाडे, डॉ. विवेक भापकर, प्रा मेधताई काळे प्रतिष्ठानचे अध्यक्ष मुकेश माधवराव मुळे, उपाध्यक्ष दत्ता पाटील नारळे, सचिव प्राचार्य डॉ. एम. एम. तांबे, खजिनदार बजरंग पाडळकर, ज्येष्ठ कवी चंद्रकांत पालवे, डॉ महेश मुळे, डॉ. लक्ष्मण कदम, प्राचार्य हनुमंतराव कणसे, प्रा लालाचंद हराळ, मसाप जिल्हा प्रमुख प्रा गणेश भगत, महेश मुळे निलेश काळदाते, म्हस्के सुनील, यांच्यासह प्रतिष्ठानचे विश्वस्त, अनेक सदस्य, सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रा. शशीकांत गाडे म्हणाले की, ''स्व. शिक्षणमहर्षी माधवराव मुळे हे केवळ एक व्यक्तिमत्व नव्हते, तर ते समाजासाठी जगणारे एक प्रेरणास्थान होते. त्यांनी आयुष्यभर समाजकारण, शिक्षण आणि दुर्बल शेतकरी घटकांच्या उन्नतीसाठी सातत्याने कार्य केले. त्यांच्या विचारांची आणि कार्यपद्धतीची परंपरा आजही प्रतिष्ठानच्या माध्यमातून पुढे चालू आहे, ही अत्यंत अभिमानाची बाब आहे.''

ते पुढे म्हणाले, ''विद्यार्थ्यांचे जीवन हेच देशाचे भविष्य आहे. ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल पार्श्वभूमी असलेल्या विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे ही समाजाची जबाबदारी आहे. आजच्या या चादर–ब्लँकेट उबदार कपडे वाटपासारखे उपक्रम हे केवळ मदत नसून विद्यार्थ्यांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडविण्याचा एक छोटासा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले. प्रतिष्ठानने आजवर अनेक सामाजिक उपक्रम मोठ्या स्वरूपात केली असून आरोग्य शिबीर ,वृक्षारोपण ,व्यवसाय मार्गदर्शन शिबिर, विद्यार्थ्यांसाठी अनेक स्पर्धा, नैसर्गिक आपत्तीच्या वेळी मदत, आयोजित करून समाजामध्ये अभिनव उपक्रम राबवण्याच कार्य प्रतिष्ठान सातत्याने करत आहे प्रतिष्ठानच्या या कार्याची सर्वांनी कौतुक केले.

## विद्यार्थी हे उद्याच्या भारताचे उज्ज्वल भविष्य – आ. संग्राम जगताप

### राजमुद्रा करिअर अकॅडमीच्या विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा संपन्न । ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी करिअरच्या नव्या वाटा खुल्या; नंदाताई पांडुळे यांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले असून स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी करिअरच्या अनेक संधी उपलब्ध झाल्या आहेत. जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रम यांच्या जोरावर यश संपादन करता येते, असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले. जिजाबाई शिक्षण संस्था संचलित राजमुद्रा करिअर अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केल्याबद्दल आयोजित सत्कार समारंभात ते बोलत होते.

या कार्यक्रमास आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योतीताई गाडे, शहर पोलीस उपअधीक्षक दिलीप टिपरसे, स्नेहालय संस्थेचे संस्थापक डॉ. गिरीश कुलकर्णी, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे, नगरसेवक महेश लोंढे, राजमुद्रा करिअर अकॅडमीच्या संचालिका नंदाताई पांडुळे, महापालिका अग्निशामक दल प्रमुख शंकर मिसाळ, ज्ञानदेव पांडुळे, उद्योजक संजय चव्हाण, देवराम परकाळे, संजय ढाकणे, संजय वाघ, सुभाष गर्जे, सागर देवकर, बंडू कवडे, कैलास जगदाळे, विशाल पांडुळे आदी मान्यवर उपस्थित होते.

आमदार संग्राम जगताप पुढे म्हणाले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना राजमुद्रा करिअर अकॅडमीच्या माध्यमातून यशाची दारे खुली झाली आहेत. संचालिका नंदाताई पांडुळे यांनी



विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन देत गुणवंत विद्यार्थी घडविण्याचे मोलाचे कार्य केले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांनी प्रेरित होऊन विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच आपल्या आवडीच्या क्षेत्रातही प्रगती साधावी. क्रीडा, प्रशासकीय सेवा, उद्योग अशा अनेक क्षेत्रांत संधी उपलब्ध असून योग्य मार्गदर्शनामुळे विद्यार्थी मोठे यश मिळवू शकतात.

महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, विद्यार्थी हे उद्याच्या भारताचे उज्ज्वल भविष्य आहेत. त्यांना योग्य दिशा, मार्गदर्शन आणि संधी मिळाली तर ते देशाचे नाव उज्ज्वल करतील. नंदाताई पांडुळे यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी केलेले कार्य अत्यंत कौतुकास्पद असून गरजू विद्यार्थ्यांना मोफत मार्गदर्शन देण्याचे काम समाजासाठी प्रेरणादायी आहे.

स्नेहालय संस्थेचे संस्थापक डॉ. गिरीश कुलकर्णी म्हणाले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेत यश मिळवताना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. अशा परिस्थितीत राजमुद्रा करिअर अकॅडमी हे केवळ प्रशिक्षण केंद्र नसून विद्यार्थ्यांसाठी गुरुकुल ठरले आहे. नंदाताई पांडुळे या विद्यार्थ्यांच्या यशासाठी झटणाऱ्या मार्गदर्शक असून विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहून त्यासाठी सतत प्रयत्नशील राहिले पाहिजे. पद मिळाले म्हणून मान–सन्मान मिळत नाही, तर समाजासाठी काम केल्याने खरी प्रतिष्ठा प्राप्त होते.

संचालिका नंदाताई पांडुळे म्हणाल्या की, गुणवत्तेचे युग सिद्ध करण्यासाठी जिद्द, चिकाटी आणि मेहनत आवश्यक आहे. राजमुद्रा अकॅडमीच्या माध्यमातून ग्रामीण विद्यार्थ्यांना करिअरच्या विविध संधी उपलब्ध करून दिल्या जात आहेत. हजारो विद्यार्थी प्रशासकीय सेवेत रुजू झाले असून गरजू, दुर्लक्षित घटकातील विद्यार्थ्यांना मोफत मार्गदर्शन दिले जाते. चांगला समाज घडविण्यासाठी आणि सक्षम पिढी निर्माण करण्यासाठी अकॅडमी सातत्याने कार्यरत आहे. शहर पोलीस उपअधीक्षक दिलीप टिपरसे यांनी स्पर्धा परीक्षा संदर्भात मार्गदर्शन करताना सांगितले की, विद्यार्थ्यांनी जिद्द, सातत्य आणि कठोर परिश्रम यांचा अंगीकार केल्यास यश निश्चित मिळते. अपयशाने खचून न जाता त्यातून शिकत पुढे जाणे महत्त्वाचे आहे.


**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### शशिकांत मुनोत यांच्या संग्रहातील प्रारंभिक दुर्मिळ नाणे



पुणे- महाराष्ट्र राज्याच्या स्थापने निमित्त १ मे १९६० रोजी राज्य सरकारतर्फे जारी करण्यात आलेले एक प्रासंगिक व दुर्मिळ नाणे पुणे येथील श्री शशिकांत मुनोत यांच्या संग्रहात जतन केलेले आहे. या नाण्याच्या एका बाजूवर समई दर्शविण्यात आली असून तिच्यावर सात ज्योती प्रज्वलित आहेत. समईच्या दोन्ही बाजूंना कमळाच्या प्रतिकृती कोरलेल्या आहेत. समईजवळ छत्रपती शिवरायांच्या मुद्रेप्रमाणे 'प्रतिपच्चंद्र लेखेव वर्धिष्णू विश्ववंदिता महाराष्ट्र स्वराज्यस्य मुद्रा भद्राय राजते' हा शिलालेख अंकित केलेला आहे. नाण्याच्या दुसऱ्या बाजूवर कमळाच्या फुलामध्ये अशोकचक्र आणि तीन सिंहांचे राष्ट्रीय चिन्ह कोरलेले आहे. त्याभोवती गोलाकार अक्षरांत 'महाराष्ट्र राज्य स्थापना वैशाख ११-१८८२ (भारतीय पंचांग दिनांक) १ मे १९६० (आंतरराष्ट्रीय दिनांक)' असा मजकूर लिहिलेला आहे. महाराष्ट्र राज्याच्या स्थापने दिवशी प्रकाशित करण्यात आलेले हे नाणे महाराष्ट्राचे वैभव, छत्रपती शिवरायांची परंपरा आणि भारताचे राष्ट्रीय प्रतीक यांचा सुंदर संगम दर्शवते. आजच्या काळात अशी नाणी अत्यंत दुर्मिळ मानली जातात, आणि त्यातील हे विशेष नाणे श्री शशिकांत मुनोत यांच्या संग्रहात जतन झालेले आहे.

### महाराष्ट्र दिनानिमित्त एशियन नोबल हॉस्पिटल येथे मोफत महिला आरोग्य तपासणी शिबिर



अहिल्यानगर- स्त्री आहे कुटुंबाचे धैर्य. तिचे आरोग्य जपणे आहे आपल्या सर्वांचे कर्तव्य या भावनेने अहिल्यानगर येथील सर्वोत्तम वैद्यकीय सेवेसाठी नावाजलेल्या एशियन नोबल हॉस्पिटल येथे महाराष्ट्र दिनानिमित्त मोफत महिला आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. दि. १ मे ते १५ मे २०२६ या कालावधीत दुपारी ३ ते ५ यावेळेत हे तपासणी शिबिर होणार आहे. स्त्री रोग तज्ज्ञ, वंध्यत्व निवारण स्पेशालिस्ट तसेच लॅप्रोस्कोपी सर्जन डॉ. मधुरा घुमरे शिबिरात रूग्ण तपासणी व उपचार मार्गदर्शन करणार आहेत. एशियन नोबल हॉस्पिटल येथे महिलांच्या समस्यांवरील अत्याधुनिक तपासण्या आणि उपचार सुविधा उपलब्ध आहेत. ॲडव्हान्स गायनॅक केअर सेंटर येथे कार्यरत आहे. गर्भधारणा न होणे, अवेळी मासिक पाळी येणे, पाळीत पोट दुखणे, कमी/ जास्त रक्तस्त्राव होणे, गर्भाशयाला सूज असणे तसेच वारंवार रक्तस्त्राव होणे, वारंवार गर्भधारणा होऊनही गर्भपात होणे, ३५ वर्षांवरील किंवा त्याखालील जोडपी यांनी प्रयत्न करूनही गर्भधारणा न होणे, अनियमित मासिक पाळी तसेच हार्मोन्स समस्या, गर्भाशयाच्या गाठी, स्तनांच्या गाठी, अंडाशयाच्या गाठी, अंग बाहेर येणे, पांढरे जाणे अशा विविध आरोग्य समस्यांची तपासणी व उपचार मार्गदर्शन या शिबिरात केले जाणार आहे. शिबिरात मोफत ओपीडी सल्ला आणि सवलतीच्या दरात उपचार केले जातील. सर्व प्रकारच्या स्त्री रोगावरील निदान, उपचार तसेच शस्त्रक्रियांसाठी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क: ०२४१-२४२१२९२/ २४२१९११/१२.

### सत्य साई भक्त रुक्मिणीबाई दुस्सा यांचे निधन



अहिल्यानगर - शहरातील जुन्या पिढीतील सत्य साई बाबा यांचे निष्ठावंत भक्त स्व. बाळकृष्ण दुस्सा यांच्या पत्नी श्रीमती रुक्मिणीबाई बाळकृष्ण दुस्सा (वय ८७) यांचे अल्पशा आजाराने मंगळवारी (दि. २९ एप्रिल २०२६) दुःखद निधन झाले. सहा दशकांहून अधिक काळ त्यांनी साई सेवेत स्वतःला अर्पण केले होते. अध्यात्मिक सेवाभाव जोपासत त्यांनी अन्नदान सेवा चालविले, संकीर्तन व भजनाच्या माध्यमातून समाजात साई विचारांचा प्रसार केला. नगरमधील संकीर्तन-नारायण सेवा भजन केंद्राच्या कार्यात त्यांनी सातत्याने सहभाग घेत साई संदेश जनमानसात पोहोचविण्याचे कार्य केले. त्यांच्या या सेवाभावी कार्याची अनुभूती देशभरातील असंख्य भक्तांनी घेतली आहे. ''चित्री चुलती'' या नावाने त्या सर्वत्र परिचित होत्या. त्यांच्या निधनाने साई भक्त परिवारावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात मुलगा नरसिंग दुस्सा व सून शोभा दुस्सा यांनी त्यांचा सेवाभावी वारसा जतन केला आहे.त्यांच्यावर अंत्यसंस्कार मालेगाव येथील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

## जनतेच्या सेवेसाठी नगरसेवक सुरेश बनसोडे यांच्या कार्यालयाचा खा. डॉ. सुजय विखे पाटील व आ संग्राम जगताप यांच्या हस्ते उद्घाटन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर शहरातील मार्केट यार्ड आनंदधाम मार्ग परिसर येथे राजकीय व सामाजिक घडामोडींनी गजबजून गेला. नगरसेवक सुरेश बनसोडे यांच्या जनसंपर्क कार्यालयाचा शुभारंभ मोठ्या उत्साहात आणि दिमाखात पार पडला. या कार्यालयाचे उद्घाटन खासदार डॉ. सुजय विखे पाटील आणि आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आले.

या प्रसंगी विविध पक्षांचे नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच प्रभाग मधील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रभागातील नागरिकांच्या समस्या तात्काळ सोडवण्यासाठी तसेच लोकांशी थेट संवाद साधण्यासाठी हे संपर्क कार्यालय सुरू करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, आपल्या वाढदिवसानिमित्त नगरसेवक बनसोडे यांनी हा उपक्रम राबवून 'जनसेवेलाच प्राधान्य' दिल्याचे यावेळी अधोरेखित झाले.

नवीन कार्यालयाच्या माध्यमातून प्रभाग १३ मधील नागरिकांना प्रशासनाशी थेट संपर्क साधणे अधिक सुलभ होणार असून स्थानिक पातळीवरील प्रश्न सोडवण्याला नवी दिशा मिळणार आहे. तसेच शासनाच्या विविध योजनांची माहिती तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविणे आणि त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी हे केंद्र प्रभावीपणे कार्यरत राहणार असल्याचे सांगण्यात आले.

## पोलीस उपअधीक्षक निरज राजगुरू यांची धडाकेबाज कारवाई

## शनिशिंगणापूर परिसरात अवैध शस्त्रासह तरुण जेरबंद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**नेवासा/शेवगाव–** अवैध शस्त्रे बाळगणाऱ्यांविरुद्ध शेवगाव विभागाचे *उपविभागीय पोलीस अधिकारी निरज राजगुरू यांनी धडाकेबाज मोहीम उघडली आहे. त्यांच्या सूचनेनुसार आणि मार्गदर्शनाखाली शनिशिंगणापूर पोलिसांनी मोठी कारवाई करत एका २३ वर्षीय तरुणाला गावठी कट्टा आणि दोन जिवंत काडतुसांसह रंगेहाथ पकडले आहे.

अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पोलीस उपअधीक्षक राजगुरू यांनी विशेष पथकांना पेट्रोलिंगच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार शनिशिंगणापूर पोलीस स्टेशनचे पथक गस्तीवर असताना त्यांना सोनई–शनिशिंगणापूर रोडवर एक तरुण शस्त्र विक्रीसाठी येणार असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. या माहितीची दखल घेत पोलिसांनी चारी नंबर ४ परिसरात तातडीने सापळा रचला.

संशयास्पदरीत्या फिरणाऱ्या कृष्णा शिवाजी डावखर (वय २३, रा. शनिशिंगणापूर) याला पोलिसांनी ताब्यात घेऊन त्याची पंचांसमक्ष झडती घेतली. त्याच्याकडे कमरेला लावलेला ३० हजार रुपये किमतीचा सिल्व्हर रंगाचा गावठी कट्टा आणि पँटच्या खिशात २ हजार रुपये किमतीची दोन जिवंत काडतुसे असा एकूण ३२ हजार रुपयांचा मुद्देमाल मिळून आला. पोलिसांनी हा सर्व ऐवज जप्त केला असून आरोपीला अटक केली आहे.

सदर धडाकेबाज कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे व वैभव कलुबर्मे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक निरज राजगुरू यांच्या नेतृत्वातील पथकाने केली. या पथकात पोलीस हवालदार ज्ञानेश्वर शिंदे, दत्तात्रय गव्हाणे, रमेश लबडे, सागर शेजुळ, मृत्युंजय मोरे, रविकांत गर्जे, भगवान वाघमोडे आणि सायबर सेलचे अरुण सांगळे यांचा समावेश होता. या कारवाईमुळे अवैध शस्त्रे बाळगणाऱ्या गुन्हेगारांमध्ये मोठी खळबळ उडाली असून, पोलीस उपअधीक्षक राजगुरू यांच्या या धडाकेबाज भूमिकेचे सर्वत्र कौतुक होत आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक बी. एन. कारखेले करत आहेत.

## एमआयडीसी पोलीस ठाण्यातील राजू सुद्रिक यांना पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह जाहीर

### मान्यवरांच्या उपस्थितीत उद्या होणार वितरण समारंभ

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** महाराष्ट्र पोलिस दलातील उत्कृष्ट कार्यगौरव म्हणून दिले जाणारे पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह यंदा एमआयडीसी पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले राजू अप्पासाहेब सुद्रिक यांना जाहीर झाले आहे. त्यांच्या उल्लेखनीय तपासकौशल्यामुळे, गुन्हे उघडकीस आणण्यात दाखवलेल्या तत्परतेमुळे आणि सेवाभावामुळे त्यांना हा प्रतिष्ठेचा सन्मान मिळत आहे. या गौरवामुळे एमआयडीसी पोलीस ठाण्यासह पोलीस विभागात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

राजू सुद्रिक यांनी आपल्या सेवाकाळात अनेक गंभीर गुन्ह्यांचा तपास यशस्वीपणे पूर्ण केला आहे. गुन्हेगारांचा माग काढताना त्यांनी वापरलेली तांत्रिक साधने, तपासातील अचूकता आणि नागरिकांप्रती असलेली जबाबदारी यामुळे ते एक कर्तव्यदक्ष पोलीस कर्मचारी म्हणून ओळखले जातात. विशेषतः औद्योगिक क्षेत्र असलेल्या एमआयडीसी परिसरात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी ते सतत प्रयत्नशील असतात.

या मानाच्या पदकाचे वितरण येत्या १ मे रोजी पोलीस मुख्यालय येथे पालकमंत्री रधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते होणार आहे. या सोहळ्यास जिल्ह्यातील वरिष्ठ पोलीस अधिकारी, प्रशासनातील मान्यवर आणि विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्ती उपस्थित राहणार आहेत हा सन्मान केवळ राजू सुद्रिक यांच्या वैयक्तिक कर्तृत्वाचा नाही, तर संपूर्ण पोलिस दलाच्या निष्ठा, परिश्रम आणि सेवाभावाचे प्रतीक मानला जात आहे. कर्तव्य, धाडस आणि प्रामाणिक सेवेमुळे मिळालेला हा बहुमान राजू सुद्रिक यांच्या कार्याची खरी पावती ठरली असून या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## पावर लिफ्टिंग स्पर्धेत अर्चना काळे हिस सुवर्णपदक

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** नुकत्याच अहिल्यानगर जिल्हा पावर लिफ्टिंग असोसिएशनने राज्य निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन केले होते.

या स्पर्धेत अहिल्यानगर पोलीस दलातील आंतरराष्ट्रीय खेळाडू अर्चना रामभाऊ काळे हिने ५७ किलो वजन गटात उत्कृष्ट खेळाडूचे प्रदर्शन करीत सुवर्णपदक पटकावले तसेच दिनांक ३ ते १० मे २०२६ या दरम्यान मुंबई येथे होणाऱ्या राज्यस्तरीय पावर लिफ्टिंग अजिंक्यपद स्पर्धे करीता तिची जिल्हा संघात निवड झाली असुन. तिच्या यशाबद्दल अहिल्यानगर जिल्हा पोलीस प्रमुख मा.श्री सोमनाथ जी घारगे साहेब अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलबरमे पोलीस उपाधीक्षक श्री देशमुख साहेब जिल्हा पावर लिफ्टिंग संघटनेचे अध्यक्ष श्री.डेवीड मकासारे सर, पोलीस निरीक्षक श्री.बालाजी वैद्य साहेब यांनी तिचे अभिनंदन केले व पुढील स्पर्धेकरिता शुभेच्छा दिल्या

अर्चना काळे यांनी यापूर्वीही राष्ट्रीय स्पर्धेत पदक मिळवून सन २०२५ मधे साउथ आफ्रिके येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय पावर लिफ्टिंग स्पर्धेत दोन रौप्य पदक पटकावून महाराष्ट्र पोलीस दलाचे नाव लौकिक केले आहे. अर्चना काळे हि सध्या नेक्स्ट लेवल फिटनेस या जिम मध्ये सराव करीत असून तिस प्रशिक्षक श्री.ओंकार गुरूम ,श्री.विजय कनोजिया सर यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले आहे

## पैठणमध्ये प्रभाग क्र. ८ मधील समस्या गंभीर; नाले स्वच्छता व पाणीपुरवठ्यावरही नागरिकांचा संताप

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण –** शहरातील प्रभाग क्र. ८ मध्ये विविध नागरी समस्या गंभीर होत असून नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर नगरसेवक गौरव भिकाजी आठवले आणि आबेद पठाण यांनी नगर परिषद प्रशासनाकडे निवेदन देत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, परिसरात मोकाट कुत्रे, गायी व डुकरे मोठ्या प्रमाणावर फिरत असल्याने नागरिकांच्या सुरक्षेला धोका निर्माण झाला आहे. मौलाना साहेब दर्गा येथील कब्रस्तान परिसरातही डुकरांचा उपद्रव वाढला असून, या ठिकाणी स्वच्छता व नियंत्रणासाठी तातडीने कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, शहरातील अनेक भागांत नाल्यांची नियमित स्वच्छता होत नसल्याने नाले तुंबले असून दुर्गंधी आणि डासांची उत्पत्ती वाढली आहे. यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याची चिंता व्यक्त करण्यात आली आहे. पावसाळ्यापूर्वी सर्व नाल्यांची तातडीने साफसफाई करण्याची गरजही अधोरेखित करण्यात आली. तसेच प्रभागातील पिण्याच्या पाण्याचा पुरवठा अनियमित व कमी दाबाने होत असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे पाणीपुरवठा नियमित व योग्य दाबाने करण्याची मागणी करण्यात आली आहे. या सर्व समस्यांवर प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन ठोस कार्यवाही करावी, अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशारा नगरसेवकांनी दिला आहे.

## महाराष्ट्राच्या मावळ्यांचे जिंजीकडे प्रस्थान

### ११३३ स्वयंसेवकांचा समावेश । सीमापार गडसंवर्धनाचा नवा अध्याय



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरातील कायनेटिक चौक येथे बुधवारी ''शिवकालीन गडकोट संवर्धन मोहीम'' अंतर्गत तामिळनाडूतील जिंजी किल्ल्याकडे रवाना होणाऱ्या स्वयंसेवकांच्या बसेसचे ध्वजप्रदर्शन आणि प्रस्थान सोहळा उत्साहात पार पडला. खासदार नीलेश लंके आणि शिवसेना नेते प्रा. शशिकांत गाडे यांच्या हस्ते नारळ फोडून भगवे झेंडे दाखवत बसेस रवाना करण्यात आल्या. तब्बल १ हजार १३३ मावळ्यांच्या उपस्थितीने परिसर देशभक्तीच्या वातावरणाने भारावून गेला.

महाराष्ट्राच्या सीमांबाहेर प्रथमच गडकोट संवर्धनाचा उपक्रम राबविण्यात येत असून तामिळनाडूतील जिंजी किल्ला येथे स्वच्छता, संवर्धन आणि जतनाची कामे करण्यात येणार आहेत. सुमारे १ हजार २०० किलोमीटरचा एकमार्गी आणि एकूण २ हजार ४०० किलोमीटरचा हा प्रवास ''आपला मावळा'' संघटनेची आतापर्यंतची सर्वात मोठी आणि दूरची मोहीम ठरत आहे.

आवश्यक साहित्य व उपकरणांसह स्वयंसेवक पूर्ण तयारीनिशी रवाना झाले असून महाराष्ट्र दिन जिंजी किल्ल्यावर साजरा करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या जिंजी किल्ल्याला छत्रपतींच्या कालखंडात विशेष स्थान आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्य परंपरेशी जोडलेला हा किल्ला पुढे छत्रपती राजाराम महाराज यांच्या संघर्षकाळात तात्पुरती राजधानी म्हणून ओळखला गेला. त्यामुळे या ऐतिहासिक स्थळी संवर्धनाची मोहीम राबविणे प्रत्येक मावळ्यासाठी अभिमानाचा क्षण ठरत आहे.

यावेळी बोलताना खासदार नीलेश लंके यांनी गडकोट हे इतिहास व स्वाभिमानाचे प्रतीक असल्याचे सांगत, महाराष्ट्रातील १४ गडांवर यशस्वी मोहिमा राबवल्यानंतर आता राज्याच्या सीमांपलीकडे जाऊन वारसा जपण्याचा संकल्प पूर्ण होत असल्याचे नमूद केले. जिंजी किल्ल्यावर सेवा करणे हे भाग्याचे असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. प्रा. शशिकांत गाडे यांनीही या उपक्रमाला चळवळीचे स्वरूप प्राप्त झाल्याचे सांगत, ही मोहीम केवळ स्वच्छतेपुरती मर्यादित नसून सांस्कृतिक जतन आणि इतिहासाची जाणीव पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविणारी असल्याचे अधोरेखित केले.

## पोलीस अधीक्षक कार्यालया समोरील उपोषणाला रिपाई महिला आघाडीचा पाठिंबा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नितीन शिरसाठ यांच्या निर्घृण खुनातील आरोपींना तात्काळ अटक करावी व त्यांच्यावर मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी शिरसाठ कुटुंबीयांसह गावातील महिलांनी जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालया समोर मुलाबाळांसह उपोषण सुरु केलेले आहे. उपोषणाच्या तिसऱ्या दिवशी बुधवारी (दि.२९ एप्रिल) रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) महिला आघाडीच्या वतीने पाठिंबा देण्यात आला.

पाठिंब्याचे पत्र रिपाई महिला आघाडीच्या शहर जिल्हाध्यक्षा ज्योतीताई पवार यांनी स्वाती नितीन शिरसाठ यांना दिले. यावेळी महिला आघाडीच्या शहर जिल्हाध्यक्ष शीतल नाटेकर, शहर उपाध्यक्ष सोनाली साळवे, शहराध्यक्ष सविता भालेराव, विश्रांती पठारे, तालुका अध्यक्ष सारिका साळवे, अलका अल्हाट, नंदा साळवे, सविता शिरसाठ, प्रतीक्षा लोखंडे, टेरेसा शिरसाठ, दिपाली शिरसाठ, संगीताताई शिरसाठ आदींसह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

दि. १२ फेब्रुवारी २०२६ रोजी घोडेश्वरी हॉस्पिटल, घोडेगाव (ता. नेवासा) येथे नितीन शिरसाठ यांची भरदिवसा गोळ्या झाडून निर्घृण हत्या करण्यात आली होती. या घटनेला तब्बल ७० ते ८० दिवस उलटूनही आरोपी अद्याप पोलिसांच्या ताब्यात आलेले नाहीत.

### राहत्यात रंगली हटके हळद!

## नगरसेविका सुनीताताई गोंदकर यांच्या भाचीच्या लग्नात गाजली बैलगाडी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**राहाता–** आजच्या आधुनिक काळात लग्न म्हटलं की आलिशान गाड्या, फुलांची सजावट आणि लाखो रुपयांचा तामझाम हे जणू समीकरणच बनले आहे. आपल्या लग्नात एन्ट्री करण्यासाठी महागड्या गाड्या असाव्यात असा अनेकांचा अट्टाहास असतो. मात्र, शिर्डीतील प्रतिष्ठित उद्योजक वसंतराव गोंदकर आणि शिर्डी नगरपरिषदेच्या नगरसेविका सौ. सुनीताताई वसंतराव गोंदकर यांच्या भाचीच्या विवाहात एक वेगळाच आदर्श पाहायला मिळाला.

नवरदेव आणि नवरीची हळदीसाठी चक्क सजवलेल्या बैलगाडीतून मिरवणूक काढण्यात आली. पारंपरिक संस्कृतीची जोपासना करणाऱ्या या अनोख्या मिरवणुकीची सध्या संपूर्ण शिर्डी परिसरात जोरदार चर्चा सुरू आहे.

शिर्डीतील वसंतराव गोंदकर यांची भाची श्वेता हिचा शुभविवाह असल्याने सध्या गोंदकर परिवारात उत्साहाचे वातावरण आहे. लग्नाच्या आदल्या दिवशी हळदीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी कोणत्याही महागड्या वाहनाचा वापर न करता, नवरदेव आणि नवरीला पारंपरिक पद्धतीने सजवलेल्या बैलगाडीत बसवून मंगल कार्यालयापर्यंत आणण्यात आले.

परंपरा आणि साधेपणाचा संगम बैलगाडीतून निघालेली ही मिरवणूक पाहून राहतेकर थक्क झाले. एका बाजूला लग्नासाठी लाखो रुपये खर्च करून परदेशी गाड्या भाड्याने घेतल्या जातात, तर दुसरीकडे शिर्डीतील एका प्रथितयश राजकीय आणि उद्योजक कुटुंबाने आपल्या भाचीच्या लग्नात भारतीय परंपरेला प्राधान्य देत हा साधेपणा जपला आहे. या मिरवणुकीत सहभागी झालेल्या वऱ्हाडी मंडळींनीही पारंपारिक गाण्यांच्या तालावर ठेका धरला होता. आधुनिकतेच्या काळात आपल्या मूळ संस्कृतीची आणि शेतीशी निगडित असलेल्या बैलगाडीची ओळख जपल्याबद्दल गोंदकर परिवाराचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# राज्यातील नामवंत महिला क्रिकेटपटूंच्या खेळाने रंगली मैदानावरील लढत

## शिवराज वॉरियर्स विरुद्ध जी.एन.एस. नाईट रायडर्स यांच्यात रंगणार अंतिम सामना



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर जिल्ह्यातील वाकोडी येथील साईदीप क्रिकेट मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या अहिल्यानगर महिला प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेने क्रीडारसिकांचे विशेष लक्ष वेधून घेतले असून संपूर्ण जिल्ह्यात महिला क्रिकेटचा उत्साह ओसंडून वाहत आहे. राज्यातील नामांकित महिला क्रिकेटपटूंच्या दमदार सहभागामुळे या स्पर्धेला राज्यस्तरीय स्वरूप प्राप्त झाले आहे. मैदानावर चौकार-षटकारांचा वर्षाव, अचूक गोलंदाजी, चपळ क्षेत्ररक्षण आणि उत्कंठावर्धक सामने यामुळे क्रिकेटप्रेमींना रोमांचकारी अनुभव मिळत आहे.

या स्पर्धेत महाराष्ट्र क्रिकेट संघाची उपकर्णधार मुक्ता नगरे, आयपीएल महिला खेळाडू पूनम खेमनर, महाराष्ट्र संघातील आरती केदार, किरण नवगिरे, अंबिका वाताडे तसेच भारतीय महिला क्रिकेट क्षेत्रातील प्रसिद्ध खेळाडू किरण नवगिरे यांनी सहभाग नोंदवत आपल्या उत्कृष्ट खेळाचे दर्शन घडविले. त्यांच्या उपस्थितीमुळे स्पर्धेची प्रतिष्ठा उंचावली असून स्थानिक महिला खेळाडूंमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.

मुंबई, पुणे, बीडसह राज्यातील विविध भागांतून महिला क्रिकेटपटूंनी या स्पर्धेत सहभाग घेतला. त्यामुळे ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंना एकत्र येत आपल्या कौशल्याचे प्रदर्शन करण्याची मोठी संधी उपलब्ध झाली. अनेक युवा महिला खेळाडूंनी फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षणातील आपल्या गुणवत्तेने उपस्थितांची मने जिंकली.

विशेष म्हणजे, अहिल्यानगर जिल्ह्यातील महिला क्रिकेटपटूंना अशा मोठ्या व्यासपीठावर खेळण्याची संधी मिळाल्याने त्यांच्या आत्मविश्वासात भर पडली आहे. अनुभवी खेळाडूंसोबत मैदानावर खेळताना नवोदित खेळाडूंना मौल्यवान अनुभव मिळत असून भविष्यात राज्य व राष्ट्रीय स्तरावर झेप घेण्याची प्रेरणा मिळत आहे.

अहिल्यानगर जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या मान्यतेने आणि एस. के. क्रिकेट अकॅडमीच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. संपूर्ण स्पर्धेला क्रिकेटपटू संदीप पडोळे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभत असून व्यवस्थापनाने उत्कृष्ट नियोजन केले आहे.

या स्पर्धेमुळे जिल्ह्यात महिला क्रिकेटला नवी दिशा मिळाली असून महिला खेळाडूंना स्वतःची क्षमता सिद्ध करण्यासाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. क्रीडाप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून खेळाडूंना दिलेला प्रतिसादही उल्लेखनीय ठरत आहे. महिला क्रिकेटच्या वाढत्या लोकप्रियतेला चालना देणारी ही स्पर्धा भविष्यात आणखी मोठ्या स्तरावर आयोजित व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

स्पर्धेचा अंतिम सामना शिवराज वॉरियर्स विरुद्ध जी.एन.एस. नाईट रायडर्स यांच्यामध्ये रंगणार असून या अंतिम लढतीकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. दोन्ही संघांनी उपांत्य फेरीत दमदार कामगिरी करत अंतिम फेरीत प्रवेश मिळविला असून विजेतेपदासाठी चुरशीची लढत होणार असल्याची चर्चा क्रिकेटप्रेमींमध्ये रंगली आहे.

# परमार्थात अहंकार हा मोठा अडसर आहे – डॉ.सी.बी कुलकर्णी

## सावेडी ज्येष्ठ नागरिक मंचातर्फे ज्ञान विज्ञान पुरस्कार



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** मनुष्य जन्म हा दुर्लभ आहे. म्हणूनच या जन्मात आपला उद्धार करून घेतला पाहिजे. माझ्या या नर जन्माचे प्रयोजन काय याचा विवेक बुद्धीने प्रत्येकाने विचार करावा. बाबा बेलसरे म्हणतात, त्याप्रमाणे सतत मी केले मीच कर्ता हा भाव ठेवल्यास तू कष्टी होशील तर, राम करता म्हणल्यास तुला यश प्राप्त होईल. म्हणूनच परमार्थात अहंकार हा मोठा अडसर आहे. असे प्रतिपादन डॉ सी.बी कुलकर्णी यांनी केले.

सावेडी ज्येष्ठ नागरिक मंचातर्फे यंदाच्या वर्षी ज्ञानविज्ञान पुरस्कार डॉ. चिंतामण भालचंद्र कुलकर्णी यांना प्रदान करण्यात आला. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी डॉ.गौरी कुलकर्णी, कुमुदिनी बोपर्डीकर, लिलाताई गोविलकर, मंदाताई सोमणी, शोभा ढेपे, अँड. नीलिमा औटी,निरंजना देशमुख,सर्वोत्तम क्षीरसागर,अँड मनोहर केसकर,डॉ.कोलते सर, हरिश्चंद्र थिगळे, स्नेहल वेलनकर, मंदाताई कुलकर्णी, पुष्पा चितांबर, बाजीराव जाधव, शुभदा जागीरदार, पुष्पा कोरे, संतोष गोरे, श्रीकांत नाईक, हेमंत लोहगावकर, पांडुरंग कुलकर्णी, वैशाली भणगे, आदिनाथ जोशी,महापुरुष सर,चारुशीला करवंदे,उमेश कुलकर्णी अमोल हातवळणे उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले, आपण जे ज्ञान मिळवतो ते आपल्या उदर भरणासाठी असते.अनेक जण अनेक क्षेत्रात ज्ञानी झालेले आपण पाहतो. पण हे झाले व्यावहारिक ज्ञान पण खरे ज्ञान हे समर्थ सांगतात तसे आत्मज्ञान आहे. आणि त्यासाठी प्रत्येकाला जीवनात सद्गुरूंची आवश्यकता असते.त्यांनी दिलेला अनुग्रह आनंदाने स्वीकारला पाहिजे.

मंचचे अध्यक्ष शरद कुलकर्णी यांनी सर्वांची स्वागत व प्रास्ताविक केले. तर सन्मानपत्रा चे लेखन पुष्प चितांबर यांनी केले.प्रमुख पाहुण्यांचा परिचय सेक्रेटरी ज्योतीताई केसकर यांनी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन निवेदिका भारती कुलकर्णी यांनी केला.तर आभार बाजीराव जाधव यांनी मानले.पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# सीताराम सारडा विद्यालयातील विद्यार्थ्यांचा निसर्गसंवर्धन उपक्रम; टाकाऊ वस्तूंमधून पक्षांसाठी शंभराहून अधिक घरटी तयार

## पक्षांनाही राहायला घरटी हवीत – अशोक डोळसे



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** हिंद सेवा मंडळाच्या सीताराम सारडा विद्यालयात एक अनोखा निसर्ग उपयुक्त उपक्रम घेण्यात आला. पाचवी ते नववीच्या विद्यार्थ्यांनी शंभराहून अधिक पक्षांसाठी सुंदर घरटी तयार केली.

सध्या ऊन, उष्णता भयंकर आहे. मनुष्याला या अति उष्णतेचा त्रास होतो आहे. आज प्राणी, पक्षी यांची अवस्था देखील खूपच बिकट आहे. पक्षी हा निसर्गाचा एक प्रमुख घटक असून मनुष्यासाठी तो अतिशय जवळचा आहे. शहरात वृक्षांची कमतरता असल्यामुळे पक्षांसाठी सध्याच्या वातावरणात आपल्या गच्चीवर, अंगणात पाण्याची व्यवस्था करणे, त्यांच्या राहण्यासाठी घरटी तयार करणे आज आवश्यक आहे. याचा विचार करून सीताराम सारडा विद्यालयात विद्यार्थ्यांना घरातील टाकाऊ वस्तूंपासून कलात्मकरीत्या पक्षांसाठी घरटी तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले.

या प्रशिक्षणात विद्यार्थ्यांना कला शिक्षक तथा मुख्याध्यापक अशोक डोळसे यांनी ही घरटी तयार करण्याचे प्रात्यक्षिक दाखविले. विद्यार्थ्यांनी देखील या उपक्रमाला उत्तम प्रतिसाद देत शंभराहून अधिक सुंदर घरटी तयार केली. या घरट्यांमध्ये पक्षी सहज बसू शकेल, त्यासोबत पाण्याची व्यवस्था, खाण्यासाठी दाणे ठेवण्याची व्यवस्था देखील विद्यार्थ्यांनी अतिशय कलात्मकतेने केलेली आहे. या उपक्रमात सहभागी विद्यार्थ्यांना विद्यालयाचे चेअरमन अजित बोरा यांनी पारितोषिके दिली. अशाच उपक्रमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो. त्यांची निसर्गाप्रती असलेली कर्तव्याची भावना जागृत होते असे यावेळी त्यांनी आवर्जून सांगत सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. आपल्या कलेच्या माध्यमातून निसर्ग संवर्धन करता येते. हा संदेश या उपक्रमातून देण्याचा हेतू असल्याचे कलाशिक्षक गणेश नागपुरे यांनी यावेळी विद्यार्थ्यांना सांगितले. पर्यवेक्षिका सौ. नंदा कानिटकर यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून स्वहस्ते त्यांना पारितोषिके दिली. छंद वर्गाच्या माध्यमातून काही निसर्ग उपयुक्त कलात्मक करता येते हे विद्यार्थ्यांनी दाखवून दिले. या घरट्यांसोबत आपला सेल्फी काढून विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त केला. या उपक्रमात विद्यार्थ्यांसमवेत त्यांच्या पालकांनी देखील उत्तम सहभाग घेतला.

या उपक्रमासाठी दीपक आरडे, चंद्रशेखर वाघ, अजय पुंड, अनंत जोशी, सौ शितल शिंदे, सौ निमा राहींज, सौ वृषाली जोशी, श्रीमती क्रांती मुंदानकर रवींद्र चोभे यांच्यासह सर्व शिक्षक- शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांनी सहकार्य केले.

# जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर मक्तापूरच्या लेकाचे यश; डॉ. सौरभ चव्हाण यांचा जंगी सत्कार

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**नेवासा–** कष्ट करण्याची तयारी आणि मनाशी पक्का निर्धार असेल तर परिस्थितीवर मात करून यश संपादन करता येते, हे नेवासा तालुक्यातील बर्हानपूर येथील डॉ. सौरभ विजय चव्हाण यांनी सिद्ध करून दाखवले आहे. डॉ. सौरभ यांनी नुकतीच एमबीबीएसची पदवी प्राप्त केल्याबद्दल, मक्तापूर ग्रामस्थ, मराठा सुकाणू समिती आणि गणेशभाऊ झगरे मित्र मंडळाच्या वतीने त्यांचा भव्य नागरी सत्कार करण्यात आला.

डॉ. सौरभ हे बर्हानपूर येथील प्रगतशील शेतकरी विजयराव चव्हाण यांचे चिरंजीव असून, मक्तापूर येथील तुकाराम पाटील बर्डे यांचे नातू व लक्ष्मणराव पाटील बर्डे यांचे भाचे आहेत. अत्यंत प्रतिकूल आणि आर्थिक परिस्थिती हालाखीची असतानाही सौरभने नीट () परीक्षेत उज्ज्वल यश मिळवले आणि आता वैद्यकीय शिक्षणाची पदवी पूर्ण केली आहे. त्याच्या या यशामुळे बर्हानपूर आणि मक्तापूर परिसरात आनंदाचे वातावरण आहे.

छत्रपती शिवाजी महाराज चौकात जंगी स्वागत

मराठा सुकाणू समितीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष गणेशभाऊ झगरे यांच्या पुढाकाराने श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकात डॉ. सौरभ यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. त्यानंतर तुकाराम पाटील बर्डे व लक्ष्मण पाटील बर्डे यांच्या निवासस्थानी विशेष सत्कार सोहळा पार पडला.

तरुणांनी सौरभचा आदर्श घ्यावा: गणेशभाऊ झगरे

यावेळी बोलताना गणेशभाऊ झगरे म्हणाले की, ''डॉ. सौरभ सारख्या तरुणाने शून्यातून विश्व निर्माण करत एमबीबीएस पदवी मिळवून मक्तापूर ग्रामस्थांची मान उंचावली आहे. आजच्या युगातील प्रत्येक युवकाने सौरभचा आदर्श घेऊन जिद्दीने आपले ध्येय गाठले पाहिजे. अशा गुणवंत तरुणांचे कौतुक करणे हे समाजाचे कर्तव्य आहे.'' याप्रसंगी तुकाराम पाटील बर्डे यांनीही आपल्या भावना व्यक्त केल्या. ''मुलाने रात्रंदिवस कष्ट केले आणि वडील विजयराव यांनी त्याला खंबीर साथ दिली, आज त्यांच्या कष्टाचे चीज झाले,'' असे त्यांनी नमूद केले.

मान्यवरांची उपस्थिती

या सत्कार सोहळ्याला प्रगतशील शेतकरी तुकाराम पाटील बर्डे, बाळासाहेब देवराव बर्डे, मराठा सुकाणू समितीचे प्रदेशाध्यक्ष गणेशभाऊ झगरे, पोलीस पाटील अनिल लहारे, माऊली कृषी सेवा केंद्राचे मालक शिवाजी दगडू बर्डे, कचरूभाऊ जामदार, संभाजी पोपटराव बर्डे, अमोल जामदार, गणेश कांगुणे, दत्तात्रय कोळेकर सर, सौरव कांगुणे, तंटामुक्त अध्यक्ष दत्ताभाऊ कांगुणे, युवा नेते मनोज झगरे, मच्छिंद्र पांडागळे, आजिनाथ सुभाष बर्डे, प्रदीप बर्डे यांच्यासह मक्तापूरचे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राजमाता जिजाऊ शहाजीराजे भोसले मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल सज्ज; लवकरच नगरकरांच्या सेवेत

## स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या प्रयत्न तू, आमदार संग्राम जगताप यांच्या पाठपुराव्याला यश



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** शहराच्या आरोग्य व्यवस्थेला नवी दिशा देणारे आणि नागरिकांसाठी अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देणारे राजमाता जिजाऊ शहाजीराजे भोसले मल्टीस्पेशालिटी सुसज्ज हॉस्पिटल आता पूर्णत्वास आले असून लवकरच नगरकरांच्या सेवेत दाखल होणार आहे. गुडगाव रोड, भोसले आखाडा परिसरात उभारण्यात आलेल्या या भव्य रुग्णालयाची पाहणी आमदार संग्राम जगताप आणि माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी केली. यावेळी आयुक्त यशवंत डांगे, माजी उपमहापौर गणेश भोसले, नगरसेवक प्रकाश भागानगरे, संजय चोपडा, महेश लोंढे, शहर अभियंता मनोज पारखे, आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, इंजिनिअर श्रीकांत निंबाळकर, इंजिनिअर गणेश गाडळकर, डॉ. दिलीप बागल, डॉ. सतीश सोनवणे, रोहन सानप आदी मान्यवर उपस्थित होते.

हे अत्याधुनिक रुग्णालय राज्याचे स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या प्रयत्नातून आणि आमदार संग्राम जगताप यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे नियोजन समितीच्या निधीतून साकार झाले आहे. तब्बल ६२ हजार स्क्वेअर फूट क्षेत्रफळावर उभारण्यात आलेल्या या सहामजली इमारतीमुळे आता शहरातील नागरिकांना दर्जेदार व आधुनिक वैद्यकीय सुविधा स्थानिक पातळीवर उपलब्ध होणार आहेत.

या रुग्णालयात १२५ बेडची क्षमता, चार ऑपरेशन थिएटर, आयसीयू, एनआयसीयू, बालरुग्णांसाठी स्वतंत्र ऑपरेशन थिएटर, ८ ओपीडी विभाग, सोनोग्राफी, सीटी स्कॅन, ईसीजी, पॅथॉलॉजी लॅब, कॅन्टीन, मेडिकल स्टोअर, कॉन्फरन्स हॉल, स्पेशल रूम्स, तसेच प्रशस्त पार्किंग व्यवस्था उपलब्ध करण्यात आली आहे. त्यामुळे हे हॉस्पिटल शहरातील सर्वसामान्यांसाठी वरदान ठरणार आहे.

यावेळी माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील म्हणाले की, ''या रुग्णालयाच्या माध्यमातून लहान मुलांचे विशेष उपचार, शस्त्रक्रिया, डायलिसिस सेवा सुरू करावी. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले हे काम आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून पूर्णत्वास आले आहे. जुने कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना कालबाह्य झाला असून आता या नव्या मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमधून गोरगरीब जनतेला मोफत आणि दर्जेदार आरोग्यसेवा मिळेल. पुढील तीन महिन्यांत या सुविधा नागरिकांसाठी खुल्या होतील. महाराष्ट्रातील महापालिकेमध्ये अहिल्यानगर महानगरपालिके च्या मालकीचे हे उत्कृष्ट आणि आदर्श हॉस्पिटल ठरेल.

ते पुढे म्हणाले की, हॉस्पिटलमधील काही उर्वरित कामांसाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल.

आमदार संग्राम जगताप यांनी सांगितले की, अहिल्यानगर महानगरपालिका आणि नगरकरांच्या मालकीचे सुसज्ज हॉस्पिटल असावे, ही अनेक वर्षांची इच्छा होती. स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या सहकार्यामुळे मोठा निधी उपलब्ध झाला. आता काही किरकोळ कामे बाकी असून त्यासाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे निधीची मागणी केली आहे. शहर विकासाच्या संकल्पनेतून एकामागोमाग एक कामे पूर्ण केली जात आहेत.

ते पुढे म्हणाले की, हरित नगर उपक्रम, तारापूर रस्त्यावरील स्ट्रीट लाईट कामाचे लोकार्पण, नेहरू मार्केटचे भूमिपूजन, तसेच सावेडी बसस्थानकाचे भूमिपूजन हे कार्यक्रम महाराष्ट्र दिनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहेत. एकूणच, शहराच्या आरोग्य सेवेत ऐतिहासिक भर घालणारे हे हॉस्पिटल लवकरच सुरू होणार असल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण असून, अहिल्यानगरच्या विकासाच्या वाटचालीत हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

(पान १ वरून)

### सराफ सुवर्णकार संरक्षण समितीचे ठिय्या आंदोलन व उपोषण सुरू

याशिवाय, कोणताही ठोस पुरावा नसताना सुमारे २०० ग्रॅम सोन्याचे जबरदस्तीने वितळवून ''रिकव्हरी'' दाखवण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. हे कृत्य खंडणी व पुराव्यात फेरफार करण्यासारखे असल्याचा दावा करण्यात आला आहे. पीडितांना झालेल्या जखमांची नोंद सिव्हिल हॉस्पिटलमध्ये झाल्याचे सांगण्यात आले असून, कस्टोडियल टॉर्चरचे स्पष्ट पुरावे उपलब्ध असल्याचा दावा करण्यात आला आहे. तसेच, ही घटना पोलीस वाहन व पोलीस ठाण्याच्या परिसरात घडल्याने संबंधित कालावधीतील सीसीटीव्ही फुटेज तात्काळ जतन करून प्रणाली सील करण्याची मागणी करण्यात आली आहे. दोषी पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांवर तात्काळ एफआयआर दाखल करावा संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करून सेवेतून बडतर्फ करावे जबरदस्तीने घेतलेले सोने परत द्यावे प्रकरणाची चौकशी सीआयडी किंवा विशेष तपास पथकाकडे द्यावी

सीसीटीव्ही फुटेज जतन करून निष्पक्ष तपास सुनिश्चित करावा

१७ एप्रिल २०२६ रोजी तक्रार देऊनही अद्याप कोणतीही कारवाई झालेली नसल्याचा आरोप संघटनेने केला आहे. दोन दिवसांत कारवाईचे आश्वासन देऊनही १२ दिवस उलटून गेल्याने संताप व्यक्त करण्यात आला. तात्काळ कारवाई न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही संघटनेने दिला आहे.

### तरुणाच्या खून प्रकरणी दोघे अटकेत

डोक्यात मारहाण करून त्याची हत्या केली. त्यानंतर मृतदेह एका पोत्यात भरून दुसऱ्या एका उसाच्या शेतात फेकून दिला,तर त्याची मोटारसायकल सीना नदीच्या पुलाजवळील झाडीत लपवून ठेवली.पोलिसांनी आरोपींनी दाखवलेल्या ठिकाणाहून मृतदेह आणि मोटारसायकल जप्त केली आहे.

### शिरसाटवाडी तलावभिंत दुरुस्ती काम युद्धपातळीवर

पाण्याचा दाब सहन करण्याची क्षमता वाढणार असून पावसाळ्यातील अतिरिक्त पाणी साठवून ठेवण्यास मदत होणार आहे. परिणामी, परिसरातील शेतीसाठीही या तलावाचा अधिक लाभ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.स्थानिक नागरिकांनी या कामाबाबत समाधान व्यक्त केले असून आमदार मोनिका राजळे व प्रशासनाचे आभार मानले आहेत. मागील वर्षी तलाव फुटण्याची भीती सतत डोळ्यासमोर होती, मात्र आता सुरू असलेल्या कामामुळे आम्हाला मोठा दिलासा मिळाला आहे अशी भावना जनार्दन शिरसाट यांनी व्यक्त केली.दरम्यान, प्रशासनाकडून हे काम निर्धारित कालावधीत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले असून येणाऱ्या पावसाळ्यापूर्वी भिंत पूर्णपणे सुरक्षित व सक्षम करण्याचा प्रयत्न सुरू आहे. प्रशासन व लोकप्रतिनिधींच्या समन्वयातून राबविण्यात येत असलेल्या या कामामुळे भविष्यातील संभाव्य आपत्ती टळणार असल्याचे यावेळी आसाराम शिरसाट म्हणाले.परिसरातील नागरिकांच्या सुरक्षिततेसह पाणी व्यवस्थापनातही मोठी सुधारणा घडवून आणणार आहे.

### जलयात्रेमुळे मध्यप्रदेश आणि महाराष्ट्राचे नाते अधिक दृढ झाले – मुख्यमंत्री डॉ.यादव

त्यांनी जीर्णोद्धार केला. असे प्रत्येक देवस्थान त्यांची गौरवगाथा गात आहे,'' असे गौरवोद्गारही मुख्यमंत्र्यांनी काढले.

'महाराष्ट्र-मध्य प्रदेश जुळे भाऊ'

''महाराष्ट्राचे नुसते नाव घेतले तरी मी रोमांचित होतो. महाराष्ट्र आणि मध्य प्रदेश जणू जुळे भाऊ आहेत,'' असे सांगून डॉ. यादव म्हणाले, ''लोकमाता अहिल्याबाईमुळे आपले नाते होतेच. गोदा ते नर्मदा जलयात्रेमुळे ते अधिक दृढ झाले. सिंहस्थामुळे नाशिक आणि उज्जैन हे तिसरे नाते आहे. महाराष्ट्राने छत्रपती शिवाजी महाराज, बाजीराव पेशवे, शिंदे, होळकर असे अनेक महापुरुष देशाला दिले. त्या सर्वांनी देशाला नवी दिशा दिल्याचे त्यांनी कृतज्ञतापूर्वक सांगितले. जलयात्रेची माहिती देताना श्री. विखे पाटील म्हणाले, ''जलयात्रेच्या माध्यमातून एक लोकचळवळ तयार झाली, ही यात्रेची मोठी फलश्रुती आहे. जलव्यवस्थापन, लोककल्याण, सुशासन यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी ओळखल्या जातात. राज्यकर्त्या म्हणून त्यांनी केलेले काम आजही आमच्यासाठी मार्गदर्शक आहे.''जलयात्रेमुळे जागरूकता' 'पाण्याच्या प्रत्येक थेंबागणिक अधिक उत्पादन' यासाठी आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी आग्रही आहेत. महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्याचा संकल्प मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोडला आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखालीच ही जलयात्रा यशस्वी झाली, असे सांगून श्री. विखे पाटील म्हणाले, ''जलयात्रेच्या निमित्ताने आम्ही महाराष्ट्रातील १३० नद्यांचे पाणी एकत्र केले. त्यातून जलसंवर्धन, पाण्याचा वापर याबद्दल मोठी जागरूकता निर्माण झाली. त्यामुळेच ही जलयात्रा केवळ धार्मिक वा आध्यात्मिक स्वरूपाची सांकेतिक यात्रा बनली नाही. त्यातून पर्यावरणाचे संरक्षण, जलसंवर्धन यावर मंथन झाले.पाणी हे जीवन आहे आणि ऊर्जाही आहे, हे या यात्रेमुळे अनेकांपर्यंत पोहोचले.''

चौदा कोटी जनतेची जलयात्रा

श्री. विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली गोदा ते नर्मदा जलयात्रेचे ऐतिहासिक आयोजन झाले, असे कौतुकोद्गार काढून श्री. बावनकुळे म्हणाले, ''मंत्रिमंडळाच्या बैठकीत श्री. विखे पाटील यांनी आम्हां सगळ्यांसमोर जलयात्रेची कल्पना मांडली, तेव्हा ती एवढी मोठी होईल, असे वाटले नव्हते. तथापि ही यात्रा व्यापक झाली, महाराष्ट्रातील १४ कोटी जनतेची ती आपली यात्रा बनली. या माध्यमातून पर्यावरण आणि जलसंधारण याबाबत मोठी जागरूकता निःसंशयपणे झाली.''संपूर्ण जग पाणीटंचाईच्या चिंतेने ग्रासले असताना आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जलसंस्कृती वर्धिष्णू करण्याबाबत बोलतात, विचार करतात. मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव त्याच रांगेत येतात. त्यांनी आखलेल्या जलगंगा समर्थन यासह अन्य मोहिमा पाहिल्या तर त्यांना मध्य प्रदेशचे 'जलक्रांतिदूत' म्हटले पाहिजे,